29-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/28/2025 9:51 PM Page 1

निवडक

शिवोली : ज्येष्ठ नागरिकाला वोकर प्रदान प्रसंगी उपस्थित कपिल कोरगावकर व इतर.

ज्येष्ठ नागरिकाला वॉकर प्रदान

■ टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. २८ : येथील सामाजिक कार्यकर्ता कपिल किशोर कोरगावकर यांच्या पुढाकाराने दांडा शिवोली येथे एका ज्येष्ठ नागरिकाला वोकर प्रदान करण्यात आला. यावेळी श्री गणेश धारगळकर,सुषमा बाणवलीकर, फ्रान्सिस फर्नांडिस, नंदिनी कोरगावकर व इतर उपस्थित होते. यावेळी बोलताना कपिल कोरगावकर म्हणाले, काही दिवसापूर्वी या परिसरात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराला मोठ्या संख्येने उपस्थित स्थानिकांची तपासणी करण्यात आली होती. अनेकांना मोफत औषधेही देण्यात आली होती. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून हा वॉकर प्रदान करण्यात येत असल्याचे कोरगावकर यांनी स्पष्ट केले. कर्ज लोकांना नियमितपणे मदत करण्याचा आपला प्रयत्न असल्याचेही कोरगावकर यांनी यावेळी सांगितले.

एक्लाटे जुने फिडरवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २८ : एक्लाटे जुने फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने रविविर दि. ३० रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत एक्लाटे भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे कामरशेट फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने सोमवार दि. ३१ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत कामरशेट कुल प्लेस बार भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

कवळे ग्रामपंचायत क्षेत्रात वीज तारांबाबत इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २८ : कवळे ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्वे क्र. २३, ११ येथे मे. महारूद्र ट्रेडिंग कंपनी यांना लीज पूरवठा करण्यासाठी नव्याने उभारण्यात आलेले २०० केव्हीए ट्रान्सफोरमर केंद्र व त्याच्या संघटित ११ केव्ही भूमीगत वीज यंत्रणा २६ मार्चपासून पासून विध्युत भारीत करण्यात आली असून यापुढेही ती तशीच भारीत राहील. लोकांनी या वरील यंत्रणेपासून दूर रहावे त्यांना स्पर्श करू नये अन्यथा जिवीतास धोका आहे.

जनावरांच्या पाय आणि तोडांला होणाऱ्या रोगाविरूद्ध लसीकरण कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २८ : पणजीतील पशूसंवर्धन आणि पशू चिकित्सा खात्याने राष्ट्रीय पशू रोग नियंत्रण कार्यक्रमाखाली १ एप्रिलपासून जनावरांच्या पाय आणि तोडांला होणाऱ्या रोगाविरूद्ध लस देण्याच्या कार्यक्रमास सुरवात करणार आहे. ३० दिवसांपर्यंत हा कार्यक्रम चालू राहणार आहे. या कार्यक्रमाखाली सर्व जनावरे आणि म्हर्शीना लस देण्यासाठी सर्व ते प्रयत्न केले जात आहे आणि जनावरांची रोगप्रतिकार शक्ती तपासण्यासाठी लस देण्यापूर्वी आणि त्यानंतर सेरा नमुने घेण्यात येतील. मार्गदर्शक तत्वानुसार लसीकरण केलेल्या जनावरांची ओळख पटविण्यासाठी त्यांच्या कानाला बिल्ला लावणे अनिवार्य आहे. लसीकरणावेळी खात्याच्या कर्मचाऱ्यांना व पथकाला सहकार्य करण्याची विनंती दूग्ध शेतकऱ्यांना करण्यात आली आहे.

गोवा राज्य ग्राहक संरक्षण मंडळाची बैठक

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २८ : नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार मंत्री रवी नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पर्वरी मंत्रालयात राज्य ग्राहक संरक्षण मंडळाची दुसरी बैठक झाली. या बैठकीला नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार खात्याचे सचिव संजीत रॉड्रिग्ज, आयएएस, गोवा राज्य ग्राहक परिषदेचे सदस्य सचिव आणि नागरी पुरवठा खात्याचे संचालक श्री जयंत तारी आणि मंडळाचे इतर सदस्य उपस्थित होते. संजीत रॉड्रिग्ज यांनी हक्कांचे रक्षण आणि समर्थन करण्याची प्रत्येकांची जबाबदारी असल्याचे सांगून या प्रयत्नात प्रत्येक खात्याने सक्रिय योगदान देण्याची गरज व्यक्त केली. या बैठकीत गोव्यात ग्राहक संरक्षण मजबूत करण्यासाठी प्रस्तावित उपक्रमांवर चर्चा करण्यात आली.

गोवा राज्य ग्राहक संरक्षण नियम लागू करणे, गोवा राज्यासाठी थेट विक्री देखरेख प्राधिकरण यंत्रणा नियम निश्चित करणे, राज्य सरकारकडे प्रलंबित असलेले राज्य आयोग आणि जिल्हा आयोगांचे प्रशासकीय मुद्दे, याव्यतिरिक्त, गोवा राज्यात बीआयएसचे उपकार्यालय आणि दक्षिण गोव्यात ग्राहक तडजोड समिती स्थापन करणे यासह इतर बाबींवर चर्चा करण्यात आली. सुरवातीस ग्राहक कक्षाचे सहाय्यक संचालक केतन फळदेसाई यांनी गोवा राज्य ग्राहक संरक्षण कायदा २०२९ विषयी माहिती दिली. भारतीय मानक ब्युरोचे सहाय्यक संचालक श्री आशुतोष अग्रवाल यांनी भारतीय मानक ब्युरोची भूमिका आणि जबाबदाऱ्या, त्यांचे कार्य आणि ऑनलाइन तक्रार नोंदवण्यासाठी बीआयएस ॲपबद्दल माहिती दिली. राष्ट्रीय तपासणी संस्थेचे शास्त्रज्ञ श्री अजय उक्रांडे यांनी विविध अभियांत्रिकी साहित्य आणि तयार उत्पादनांच्या चाचणी, मूल्यांकन आणि गुणवत्ता नियंत्रणात विशेषज्ञ असलेल्या त्यांच्या संस्थेबद्दल स्पष्टीकरण दिले. गोवा राज्यासाठी विशिष्ट ग्राहक संरक्षण नियम अधिसूचित करण्यासाठी एक उपसमिती स्थापन करण्याचा प्रस्ताव मंडळाचे सदस्य ॲड. यतिश नाईक यांनी मांडला. रोलँड मार्टिन्स यांनी जिल्हा पोलिस-सायबर क्राइम सेल, आरबीआय गोवा कार्यालय, कदंब कॉर्पोरेशन, पेयजल विभाग, एलपीजी एजन्सीचे प्रतिनिधी, डब्ल्यूआरडी, अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा संचालनालय इत्यादींना मंडळाचे सदस्य म्हणून ठेवण्याची सूचना केली. नागरी पुरवठा निरीक्षक श्रीमती प्रियंका कुडणेकर यांनी बैठकीचे सूत्रसंचालन केले. नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार संचालक जयंत तारी यांनी मंडळाच्या इतर सदस्यांसह बैठकीत सहभाग घेतला.

हरमल बामणभाटी येथे ३१ रोजी शंभूराजे नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २८ : बामणभाटी येथे गुढीपाडव्यानिमित वर्ष पद्धतीप्रमाणे श्री राष्ट्रोळी कला वर्धिनी निर्मित शंभूराजे नाटक सोमवार दि. ३१ रोजी संध्याकाळी ७ वाजता श्री राष्ट्रोळी पटांगण, बामणभाटी येथे होणार आहे. या नाटकाचे दिग्दर्शन विलास परब, पार्श्वसंगीत द्वारकानाथ गवंडी, नेपथ्य, प्रकाशयोजना, गुरुप्रसाद नाट्यभंडार, कासारपाल, ध्वनी सुभाष शिरोडकर, बांदा यांची आहे. या नाटकात संजय नाईक, कृष्णा (नाना) नाईक, विजय बर्डे, अमर नाईक, नंदू पै, दशरथ वस्त, समीर नाईक, साईदास नाईक, श्रीकांत कान्होजी, सद्गुरू नाईक,संजय रघुवीर नाईक, प्रथमेश मयेकर, सोनिया शेट्ये, नमिता पिंगे तसेच स्वराज नाईक, पुष्कर नाईक, सिद्धांत नाईक, शंकर वायंगणकर, सिद्ध वायंगणकर यांच्या भूमिका आहेत.तरी नाट्य रसिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्री राष्ट्रोळी कलावर्धिनी संस्थेने केले आहे.

उपाययोजनांची अंमलाबजावणी न झाल्यास तीव्र आंदोलन

कुंकळळी औद्योगिक वसाहतीतील प्रदुषणाबाबत युरी आलेमाव यांचा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २८ : गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने कुंकळळी औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण समस्यांवर तोडगा काढण्यासाठी प्रस्तावित केलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात आली नाही तर लोकक्षोभ उफाळून येईल, असा इशारा विरोधी पक्षनेते आणि कुंकळळीचे आमदार युरी आलेमाव यांनी दिला आहे.

आलेमाव यांनी वारंवार या समस्येकडे लक्ष वेधल्यानंतर राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्यांना पत्राद्वारे प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना हाती घेत असल्याची माहिती दिली. या उपाययोजनांमध्ये भूजल निरीक्षण,

वातावरणीय हवेच्या गुणवत्तेवर देखरेख, दुर्गंधी अभ्यास, सामान्य सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात सुधारणा, धूळ निरीक्षण उपकरणे बसवणे, सातत्यपूर्ण वायू गुणवत्ता निरीक्षण आणि धोकादायक कचऱ्याचे व्यवस्थापन यांचा समावेश आहे.

कुंकळळी औद्योगिक वसाहतीतील प्रदूषणाचा मुद्दा आम्ही सातत्याने उपस्थित केला आहे. आरोग्य विभागाच्या सर्वेक्षणानुसार अनेक रहिवासी गंभीर आरोग्य समस्यांनी ग्रस्त आहेत. हे प्रदूषण कायमचे थांबले पाहिजे, असे आलेमाव यांनी स्पष्ट केले. प्राथमिक आरोग्य केंद्र बाळळी यांनी केलेल्या सर्वेक्षणात सिम्पलेअर, केगडिकोट्टो, मास्कोनी, बेलाथेंब, गुलेकोट्टो, भट्टी, ताकाबंद आणि आयडीसी परिसरातील रहिवाशांमध्ये कर्करोग, श्वसनाचे विकार, सोरायसिस, मूत्रपिंडाचे आजार आणि इतर गंभीर आजार आढळले आहेत. सर्वेक्षणानुसार २८ जणांनाश्वसनाचे विकार, २९ जणांना त्वचेच्या ऍलर्जीचा त्रास, ११ जणांना दम्याचा विकार, १ रुग्णाला क्रोनिक किडनी आजार, ८ जणांना सायनसची समस्या, २ जणांना क्षयरोगाचा पूर्वीचा इतिहास, १ रुग्णाला सोरायसिस तसेच अनेकांना धुळीची ऍलर्जी आणि डोळ्यांच्या जळजळीच्या तक्रारी देखील मोठ्या प्रमाणात नोंदवण्यात आल्या आहेत.

मी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाला कारवाईसाठी सतत पत्र पाठवत आहे. त्यांनी मला उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे, मात्र त्या केवळ औपचारिकता म्हणून न राहता प्रभावीपणे अंमलात आणल्या गेल्या पाहिजेत. अन्यथा, मी कुंकळळी जनतेसोबत प्रदूषणाविरोधात लढा देत राहीन, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. औद्योगिक वसाहतीतील मत्स्य प्रक्रिया युनिट्स आणि पोलाद उत्पादन युनिट्समुळे पाणी व वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत असल्याचे आलेमाव यांनी निदर्शनास आणले. त्यांनी औद्योगिक कचऱ्याचे व्यवस्थापन, वाढते प्रदूषण आणि आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

२०२५-२६ च्या अर्थसंकल्पात सरकारने धोकादायक कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी आणि महिला वसतिगृह उभारणीसाठी निधी मंजूर करण्याचे आश्वासन दिले आहे. आता सरकारने आपल्या वचनबद्धतेवर ठाम राहून हे प्रकल्प वेळेत पूर्ण करावेत, असेही त्यांनी सांगितले. कुंकळळी औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण ही गंभीर समस्या असून, प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची त्वरित अंमलबजावणी न केल्यास स्थानिक जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा विरोधी पक्षनेत्यांनी दिला आहे.

स्थलांतरित कामगारांची पडताळणी होणार

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २८ : औद्योगिक वसाहती आणि विविध प्रकल्पांसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केलेल्या कामगारांच्या सुरक्षिततेसाठी सरकारने भाडेकरू पडताळणी मोहीम अधिक व्यापक करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी औद्योगिक वसाहतींमध्ये स्थलांतरित कामगारांसाठी पडताळणी प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. मात्र, यामुळे दैनंदिन औद्योगिक कामकाजावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही, याची त्यांनी हमी दिली.

औद्योगिक वसाहतींमध्ये स्थलांतरित कामगारांची भाडेकरू पडताळणी बंधनकारक करण्यात आली आहे. या प्रक्रियेसाठी कामगार आणि पोलिस विभागामध्ये समन्वय साधला जाणार असून, अद्याप पालन न करणाऱ्या कंपन्यांना त्वरित पावले उचलण्यास सांगितले जाईल, असे मुख्यमंत्री सावंत यांनी पत्रकारांशी संवाद साधताना स्पष्ट केले.

गोवा राज्य १०० टक्के सुरक्षित असल्याचा पुनरुच्चार करताना मुख्यमंत्र्यांनी स्थलांतरित नागरिकांशी संबंधित काही घटनांचे संकेत दिले. आतापर्यंत राज्यात ७०,००० भाडेकरूंची पडताळणी पूर्ण झाली असून, नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

गृहमंत्री पदाचा कार्यभार सांभाळणारे सावंत पुढे म्हणाले की, भविष्यात तात्पुरते कामगार नेमणाऱ्या कंत्राटदारांना त्यांच्या पडताळणीची जबाबदारी घ्यावी लागेल. बांधकाम स्थळांवर काही घटना घडल्या आहेत. अशा घटनांना आळा घालण्यासाठी योग्य ती पावले उचलली जातील. या प्रक्रियेस अधिक सुलभ करण्यासाठी भाडेकरू पडताळणी आता ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

महिलांच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर, विशेषतः महिला काँग्रेसने उपस्थित केलेल्या चिंतेला उत्तर देताना सावंत म्हणाले, गोवा हे महिलांसह एकट्या व गटाने प्रवास करणाऱ्या पर्यटकांसाठी १०० टक्के सुरक्षित आहे. पोलिस सेवा, हेल्पलाइन आणि 'पिंक फोर्स' कार्यरत आहेत. कोणत्याही प्रकारच्या अनुचित घटनांवर प्रशासन लक्ष ठेवून आहे.

गोवा हे प्रमुख पर्यटन स्थळ असल्याने सुरक्षा सुनिश्चित करणे अत्यावश्यक असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी पोलिसांना संशयास्पद व्यक्तींवर सतत नजर ठेवण्याच्या सूचना दिल्या. पर्यटकांची सुरक्षा महत्त्वाची आहे, परंतु स्थानिक नागरिकांच्याही सुरक्षिततेची जबाबदारी प्रशासनावर आहे. अलीकडील काही गुन्ह्यांमध्ये पर्यटकांचा सहभाग असल्याचे आढळले आहे. त्यामुळे पोलिसांनी अधिक सतर्क राहावे, असे ते म्हणाले.

दरम्यान, राज्य स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनी सामूहिक प्रयत्न करावेत, असे आवाहन करत मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. स्वच्छता ही सामूहिक जबाबदारी आहे. पोलिसांनी रस्त्यांवर कचरा टाकणाऱ्या वाहन मालकांविरोधात तात्काळ कारवाई करावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

गणवेशधारी पोलिसांना सार्वजनिक कार्यक्रमात सहभागास मनाई

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २८ : गोवा पोलिसांनी शिस्त आणि गणवेशाची प्रतिष्ठा राखण्यासाठी महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार, गणवेशधारी पोलिस कर्मचाऱ्यांना सार्वजनिक स्टेज आणि रस्त्यावरील कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच, गाणे व नृत्य करण्यावरही निर्बंध लावण्यात आले आहेत. पोलिस अधीक्षक (प्रशिक्षण) सुचेता देसाई यांनी गुरुवारी हा आदेश जारी केला.

या निर्देशानुसार, पोलिस कर्मचाऱ्यांनी थेट सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये सहभाग टाळावा. मात्र, ते या कार्यक्रमांसाठी सुविधा पुरवू शकतात. आदेशात असे स्पष्ट करण्यात आले आहे की, पोलिसांनी गणवेशाच्या प्रतिष्ठेचे भान ठेवून वर्तन करावे आणि समाजासमोर पोलिस दलाची योग्य प्रतिमा सादर करावी.

समाजाभिमुख उपक्रमांमध्ये पोलिसांचा सकारात्मक सहभाग वाढावा यासाठी काही बाबतीत सूट देण्यात आली आहे. सामाजिक जाणीव निर्माण करण्याच्या हेतूने पोलिस स्टेशनना विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यास प्रोत्साहन दिले आहे. तसेच, भारत दर्शनसारख्या शैक्षणिक सहलींमध्ये मुलांच्या आणि विद्यार्थ्यांच्या गटांना पोलिस कर्मचाऱ्यांसोबत जाण्याची परवानगी देण्यात आली आहे.

गणवेशात असताना पोलिस कर्मचारी केवळ स्वतःचेच नव्हे, तर संपूर्ण पोलिस दलाचे प्रतिनिधित्व करत असतात. त्यामुळे सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सहभाग कायद्याच्या चौकटीत राहावा, याकडे विशेष लक्ष दिले जाईल. सार्वजनिक कामगिरीतील पटकथा व कथानक हे पोलिस दलाच्या नियम व कार्यपद्धतीशी सुसंगत असतील, याची खात्री करण्याचा आदेश देण्यात आला आहे. कोणत्याही स्वरूपाच्या चुकीच्या प्रतिमा निर्माण होणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे निर्देश यात आहेत.गोवा पोलिसांनी लागू केलेला हा नवा नियम पोलिस दलाच्या शिस्तीला आणि सामाजिक प्रतिमेला अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

तक्रारदाराला १७ लाख परत करण्याचे बिल्डरला 'रेरा'चे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २८ : गोवा रिअल इस्टेट रेग्युलेटरी अथॉरिटी 'रेरा' ने एक बिल्डर आणि अन्य दोन व्यक्तींना पुढील ३० दिवसांच्या आत तक्रारदाराला १७ लाख रुपये परत करण्याचे निर्देश दिले आहेत. या कालावधीत परतफेड न झाल्यास, त्यावर वार्षिक ११.१० टक्के व्याज आकारले जाणार आहे.

प्राधिकरणाने स्पष्ट केले की दिवाणी खटला दाखल असला तरी,'रेरा' समोर व्याजासह परतफेडीसाठी अर्ज सादर करण्यास कोणताही अडथळा नाही. तक्रार तीन वर्षांपासून प्रलंबित असली तरी,'रेरा' सदस्य विन्सेंट डि'सिल्वा यांनी अवघ्या तीन महिन्यांत हा निकाल जाहीर केला.

'रेरा'कायद्याच्या कलम १३ आणि १८ च्या उल्लंघनाबद्दल, कलम ६१ अंतर्गत प्रतिवादींना ५ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. त्यांना आदेशाच्या ६० दिवसांच्या आत शपथपत्राच्या स्वरूपात अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अन्यथा, प्राधिकरण पुढील कायदेशीर कारवाई करेल.

याबाबत अधिक माहिती अशी की, फोंडाच्या सेलिना रॉड्रिग्ज ब्रागांझा यांनी एका बिल्डर आणि इतर तीन जणांविरोधात गोवा 'रेरा' कडे तक्रार दाखल केली होती. त्यांनी कुर्ती, खांडेपार येथे सुरू असलेल्या गृहनिर्माण प्रकल्पातील फ्लॅट खरेदीसाठी करार केला होता. या व्यवहारात त्यांनी २६ ऑक्टोबर २०१८ ते ६ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत टप्प्याटप्प्याने १७ लाख रुपयांची आगाऊ रक्कम दिली होती. उर्वरित रक्कम ताबा मिळाल्यानंतर देण्याचे ठरले होते. प्रतिवादींनी डिसेंबर २०१९ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते.मात्र, डिसेंबर २०२० मध्ये तक्रारदाराला ४.४८ लाख रुपये भरण्यासाठी नोटीस पाठवण्यात आली. चौकशीअंती प्रतिवादी आपल्या मागणीवर ठाम राहिले. यामुळे वाद निर्माण झाला, कारण बिल्डरने ठरलेल्या मुदतीत कराराची अंमलबजावणी केली नव्हती.

तक्रारदाराने प्रतिवादींना कायदेशीर नोटीस पाठवत, त्यांच्या करारानुसार व्यवहार पूर्ण करण्यास सांगितले. मात्र, प्रतिवादींनी प्रत्युत्तरात असा युक्तिवाद केला की तक्रारदाराने आधीच दिवाणी खटला दाखल केला असल्याने, एकाच मुद्द्यावर दोन ठिकाणी सुनावणी होऊ शकत नाही. त्यांचा दावा होता की ही तक्रार केवळ दिवाणी स्वरूपाची असून, कोणत्याही कायद्याचे उल्लंघन झालेले नाही.

प्राधिकरणाने प्रतिवादींच्या दाव्याला अमान्य करत तक्रारदाराच्या बाजूने निकाल दिला. त्यांनी तक्रारदारास १७ लाख रुपये परत करण्याचे आदेश दिले असून, तसे न झाल्यास वार्षिक ११.१० टक्के व्याज आकारले जाईल. तसेच, ५ लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

आगोंद समुद्रकिनारी पाच आस्थापनांचे टाळे उघडले

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २८ : उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आगोंद समुद्रकिनाऱ्यावर टाळे ठोकण्यात आलेल्या ६७ आस्थापनांपैकी पाच आस्थापनांचे टाळे उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर आणि मामलेदार मनोज कोरगावकर यांच्या उपस्थितीत शुक्रवारी काढण्यात आले.

कासव संवर्धनासाठी राखीव असलेल्या आगोंद समुद्रकिनारी बेकायदेशीररित्या उभारण्यात आलेल्या ६७ आस्थापनांवर उच्च न्यायालयाने १९ तारखेला टाळे ठोकण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार २० तारखेपासून सकाळी ११ वाजल्यापासून ही कारवाई सुरू करण्यात आली आणि २४ तारखेपर्यंत संपूर्ण आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली.

या कारवाईनंतर आस्थापनांचे मालक ग्रेगोरियो आफोंसो (क्युबा आगोंद), प्रशांत काणकोणकर (सिमरोज), कार्मेलिनो रॉड्रिग्स (फातिमा गेस्ट हाऊस), सेल्सो फर्नांडिस (गेस्ट हाऊस आणि बार) आणि गिल्बर्ट क्रोयडोन (आगोंद सनसेट) यांनी उच्च न्यायालयात धाव

आगोंद : ५ आस्थापनांचे टाळे न्यायालयाच्या आदेशानंतर काढताना उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर, मामलेदार मनोज कोरगावकर व इतर.

घेतली. त्यांनी आवश्यक परवाने सादर केल्यानंतर न्यायालयाने त्यांच्या आस्थापनांची पुनर्बहाली करण्याचा आदेश दिला. त्यानुसार, उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही कारवाई पार पडली.

न्यायालयाच्या आदेशानंतर संबंधित आस्थापनांचा पाणीपुरवठा आणि वीजजोडणी तोडण्यात आली होती. आदेशाची अंमलबजावणी करताना संबंधित आस्थापनांना नोटिसा देऊन टाळे ठोकण्यात आले होते. कारवाई दरम्यान, आस्थापनांच्या मालकांनी कोणताही विरोध दर्शवलेला नव्हता. काही आस्थापनांचे मालकांनी स्वतःहून आस्थापने हटवली होती, तर काहींना त्यांचा माल बाहेर काढण्यासाठी थोडा वेळ दिला गेला होता.

गोवा उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने किना-यावर बेकायदेशीर आस्थापनांमुळे कासव संवर्धन मोहिमेला अडथळा निर्माण होत असल्याचे निरीक्षण नोंदवले होते. त्यामुळे उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर यांना २४ तासांच्या आत टाळे ठोकण्याचा आदेश देण्यात आला होता. या आदेशानुसार प्रशासनाने कार्यवाही करून संबंधित आस्थापनांवर कारवाई केली.

काणकोण सामाजिक आरोग्य केंद्रात साधनसुविधांचा अभाव

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ डॉक्टर आणि कर्मचारी अपुरे : आरोग्य संचालकांना निवेदन सादर

काणकोण, दि. २८ : काणकोण नगरपालिकेचे नगरसेवक शुभम कोमरपंत यांनी काणकोणच्या सामाजिक आरोग्य केंद्रातील अपुरे डॉक्टर व कर्मचारी तसेच साधनसुविधा अभाव यासंबंधीचे निवेदन आरोग्य संचालकांना काल सादर केले. या आरोग्य केंद्राचा कारभारात त्वरित सुधारणा घडवून आणण्याची मागणी निवेदनात केली आहे.

काणकोण सामाजिक आरोग्य केंद्रातून मिळालेल्या माहितीनुसार या केंद्रात सध्या वैद्यकीय अधिकारी, फार्मासीस्ट यांची कमतरता असून, या केंद्रात नियमित प्रसूती तज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, ईएनटी तज्ज्ञ नाहीत. मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी फिजिशिअन उपलब्ध होत नाहीत. २४ तास रेडिओलॉजिसट उपलब्ध नसतात. रुग्णणवाहिका असल्या तरी चालक मात्र आणीबाणीच्या प्रसंगी उपलब्ध नसतात. रुग्णवाहिकेची नियमित देखभाल करण्यात येत नसल्यामुळे त्यात वारंवार बिघाड होत असल्याची कारणे पुढे केली जातात आणि अन्य कित्येक आवश्यक सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे शुभम कोमरपंत यांनी आरोग्य संचालकांच्या निदर्शनास आणून दिले.

केंद्रातील कर्मचाऱ्यांसाठी बायो मेट्रिक पद्धत लागू करणे आवश्यक आहे. डॉक्टर आणि अन्य कर्मचाऱ्यांसाठी उभारलेले सरकारी निवासी गाळे गाळे त्वरित दुरूस्त करणे आवश्यक असून, तेव्हाच डॉक्टर या ठिकाणी राहू शकतील. या परिसराचे सौंदर्यीकरण करण्याची मागणी श्री. कोमरपंत यांनी केली आहे. सरकारी सामाजिक आरोग्य केंद्राशिवाय या ठिकाणी एकही अन्य इस्पितळ नसल्यामुळे या केंद्राचा कारभार सुधारण्याकडे आरोग्य खात्याने लक्ष देण्याची मागणी नगरसेवक शुभम कोमरपंत यांनी केली आहे